SHRI SHIVAJI EDUCATION SOCIETY AMRAVATI'S

**SHRI SHIVAJI ARTS, COMMERCE AND SCIENCE MAHAVIDYALAYA, MOTALA DIST.BULDANA**

**DEPARTMENT OF MARATHI**

**ACADEMIC YEAR- 2022 – 2023**

**INAUGURATION OF MARATHI STUDY BOARD**

**Date: - 26-09-2022**

---

# Report

श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मोताळा येथे मानर्वाविधा शाखा अंतर्गत 'मराठी अभ्यास मंडळ' उद्घाटन सोहळा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गजानन जाधव सर होते तर उद्घाटक म्हणून प्रसिध्द कवी, गीतकार, साहित्यिक डॉ. गोविंद गायकी लाभले होते. प्रमुख पाहुणे वऱ्हाडी कवी श्री तुळशिराम मापारी प्रमुख उपस्थिती मध्ये डॉ. सुबोध चिंचोले जिजामाता महाविद्यालय बुलडाणा, डॉ. तुकाराम मोरे जनता कला, वाणिज्य महाविद्यालय मलकापूर हे होते.

सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज, संत गाडगेबाबा, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

उद्घाटकीय भाषणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना डॉ. गोविंद गायकी सरांनी 'जागतिकीकरणात' मराठी भाषा ताठमानेने कायम उभी राहील यासाठी शासन स्तरावर प्रयत्न होणे गरजेचे आहे. मराठी भाषा ही आपल्या महाराष्ट्राची मायबोली आहे. तिच्यात वात्सल्याचे व संस्काराचे बोल आहेत. बोली भाषा जरी रांगडी वाटत असली तरी तिच्यामध्ये एक आपलेपणा जाणवतो. त्यानंतर त्यांची सुप्रसिध्द 'मैना' व 'पाकोळी' या कवितेचे सादरीकरण करून स्वअभिनीत 'मयना' या कवितेवरील गीताचा म्युझिक विडियो दाखविण्यात आला.

प्रमुख पाहुणे वऱ्हाडी कवी श्री तुळशिराम मापारी यांनी सांगितले की आजच्या पिढीमध्ये मराठी भाषेच्या वापरासंबंधी उदासीनता दिसून येते. परंतु ग्रामीण भागात अजूनही बोलीभाषेतूनच भावनांची अभिव्यक्ती होते. श्री मापारी भाऊ यांनी आपल्या वऱ्हाडी भाषेतील शेतकरी जीवनाचे दर्शन घडविणाऱ्या कविता सादर केल्या त्यामध्ये त्यांची गाजलेली कविता 'झाडाच्या डांगीले झोयीचा पायना' सादर करून सर्वांची मने जिंकली.

मा. प्राचार्य डॉ. गजानन जाधव सर यांनी अध्यक्षीय मनोगतातून केवळ आपल्या बोलण्यातून नव्हे तर आचार-विचारातून मराठी भाषा दिसायला हवी. जागतिकीकरणाच्या या स्पर्धेत आपण सर्वांनी मराठीचा जागर करून तिचे संवर्धन केले पाहिजे.

यावेळी ‘मराठी अभ्यास मंडळ’ कार्यकारिणीतील सर्व सभासदांचे मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | - | आदित्य विलास इंगळे | B.A. III |
| उपाध्यक्ष | - | अनिरुध्द सुभाष इंगळे | B.A. II |
| सचिव | - | लहू दशरथ चव्हाण | B.A. III |
| कोषाध्यक्ष | - | कु. लक्ष्मी लहू जवरे | B.A. II |
| सदस्य | - | शुभम विठ्ठल पागृत | B.Com III |
| सदस्य | - | कु. सरला रघुनाथ लाड | B.A. I |
| सदस्य | - | सिद्धार्थ गौतम इंगळे | B.A. I |

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सौ. नंदा मास्कर यांनी केले. सूत्रसंचालन कु. अश्विनी सोनुने हिने केले तर आभार प्रदर्शन अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. पुरुषोत्तम चाटे यांनी केले.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील डॉ. सुनील मामलकर, प्रा. अविनाश मेहेरकर, डॉ. चंदन राठोड, डॉ. अभय ठाकुर, प्रा. भास्कर भिसे, डॉ. अरुण गवारे, प्रा. धीरज चन्नेकर, प्रा. प्रतीक गायकी, प्रा. ब्राम्हणकर, प्रा. नागेश गट्टूवार, प्रा. निलेश राहाटे, प्रा. दादा मनगटे, प्रा. शुभम साखरे आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




OPPO Reno5 Pro 5G
Gattuwar N | 2022.09.26 13:13


OPPO Reno5 Pro 5G
Gattuwar N | 2022.09.26 13:29